महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३०९ वे | दिनांक : ०६/११/२०२६ | वार : शुक्रवार

कुडाळ एमआयडीसीसाठी ३४ कोटींचा निधी; मालवणी भाषेसाठी स्वतंत्र संशोधन केंद्र



सिंधुदुर्ग : कोकणातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी कुडाळ एमआयडीसीच्या पायाभूत सुविधांच्या विकासासह विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. कुडाळ एमआयडीसीसाठी सुमारे 34 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, अंतर्गत वीज जोडणी आणि केबलिंगच्या कामांसाठी 10 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. तसेच उद्योगांसाठी आकारण्यात येणारा कर 7 रुपयांवरून 4 रुपये करण्यात आला आहे. उद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी सिंधुदुर्गात दर गुरुवारी एमआयडीसीचे अधिकारी आणि त्यांची संपूर्ण टीम उपस्थित राहणार आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सिंधुदुर्ग दौऱ्यात ही माहिती दिली. कुडाळ ही कोकणातील महत्त्वाची औद्योगिक वसाहत असून, या एमआयडीसीच्या विकासासाठी निलेश राणे यांनी पुढाकार घेतला होता. तसेच ओसरी येथील एमआयडीसीच्या प्रश्नांवरही लक्ष देण्यात आले आहे. या भागातील उद्योगांना प्रोत्साहन मिळावे आणि उद्योजकांना आर्थिक दिलासा मिळावा, यासाठी सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यामध्ये कराचा दर 7 रुपयांवरून 4 रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय स्थानिक तरुणांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण मिळावे, यासाठी स्किल सेंटर उभारण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद केली जात आहे. कुडाळ एमआयडीसीमधील अंतर्गत वीज व्यवस्था आणि केबलिंगचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. या कामांसाठी 10 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. निलेश राणे यांच्या मागणीनुसार सुमारे 34 कोटी रुपयांचा निधी कुडाळ एमआयडीसीच्या विकासासाठी देण्यात आला आहे. या निधीतून होणाऱ्या कामांचा सामंत यांनी आढावाही घेतला. एमआयडीसीमध्ये 43 भूखंडधारकांनी भूखंड घेतले आहेत. या उद्योजकांना पुढील नियोजन कसे करावे, उद्योग सुरू करण्यासाठी कोणते सहकार्य आवश्यक आहे आणि त्यांच्या अडचणी कशा सोडवता येतील, याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. सिंधुदुर्गातील उद्योजकांना प्रत्येक कामासाठी रत्नागिरीतील एमआयडीसी कार्यालयात जावे लागू नये, यासाठी प्रशासनाच्या कामकाजात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दर गुरुवारी सिंधुदुर्गात एमआयडीसीचे आरओ, एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर आणि त्यांची संपूर्ण टीम उपस्थित राहणार आहे. एमआयडीसीशी संबंधित कागदपत्रे आणि प्रक्रियांमध्ये साक्षीदार म्हणून अधिकाऱ्यांची आवश्यकता असते. त्यासाठी रत्नागिरीहून अधिकारी बोलवावे लागत होते. ही अडचण दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे दोन नायब तहसीलदार उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे. त्यांची साक्षीदार म्हणून नियुक्ती करण्याचे नियोजन आहे. याशिवाय एमआयडीसीचे डेप्युटी सीईओ दर 15 दिवसांनी, तर जॉइंट सीईओ दर तीन महिन्यांनी सिंधुदुर्गात उपस्थित राहणार आहेत. या सर्व निर्णयांमुळे उद्योजकांच्या अडचणी स्थानिक पातळीवर सोडवण्यास मदत होईल, असा विश्वास सामंत यांनी व्यक्त केला. या बैठकीनंतर एमआयडीसी असोसिएशनचे पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक समाधानी असल्याचेही त्यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी सिंधुदुर्ग दौऱ्यात पिंगुळी येथील रेखांकनाचा मुद्दा उपस्थित केला होता. संबंधित रेखांकन रद्द करण्याची मागणी करत हा प्रश्न विधानसभेत मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. यावर उदय सामंत यांनी प्रतिक्रिया देताना जयंत पाटील यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने या विषयाची संपूर्ण माहिती घेणे आवश्यक होते, असे मत व्यक्त केले. या प्रकरणात पूर्वी काय घडले आणि सध्या नेमकी काय परिस्थिती आहे, याची माहिती घेतली असती तर त्यांचा गैरसमज दूर झाला असता. काही लोकांनी चुकीची माहिती दिल्यामुळे त्यांचे मत तयार झाले असण्याची शक्यता आहे, असे सामंत म्हणाले.

मंत्री हसन मुश्रीफ यांना इडी कडून दिलासा



मुंबई : राज्याचे मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हसन मुश्रीफ यांना मनी लाँड्रिंग प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ED) दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट मुंबईतील विशेष PMLA न्यायालयाने स्वीकारला आहे. त्यामुळे हसन मुश्रीफ आणि त्यांच्या मुलांविरोधात २०२२ मध्ये सुरू झालेली मनी लाँड्रिंगची कारवाई अधिकृतपणे संपुष्टात आली आहे. विशेष म्हणजे, एकीकडे कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघातील राजकीय घडामोडींमुळे मुश्रीफ चर्चेत असताना न्यायालयाच्या या निर्णयामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबईतील विशेष PMLA न्यायालयाने हा निर्णय देताना या प्रकरणातील मूळ गुन्हेच मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केल्याची बाब महत्त्वाची मानली. मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (PMLA) कारवाई सुरू ठेवण्यासाठी संबंधित आर्थिक गैरव्यवहाराचा मूळ गुन्हा अस्तित्वात असणे आवश्यक असते. मात्र, या प्रकरणातील दोन्ही मूळ गुन्हे न्यायालयाने रद्द केल्यामुळे ईडीची कारवाई पुढे सुरू ठेवण्यास कायदेशीर आधार उरला नव्हता. विशेष PMLA न्यायाधीश एस. व्ही. सहारे यांनी या प्रकरणावर सुनावणी करताना महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. मनी लाँड्रिंगचा गुन्हा टिकण्यासाठी त्यामागे अनुसूचित गुन्हा म्हणजेच मूळ आर्थिक गैरव्यवहाराचा गुन्हा असणे आवश्यक आहे. संबंधित मूळ गुन्हा उच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर त्याच्या आधारे सुरू असलेली PMLA अंतर्गत कारवाई कायम ठेवता येत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने तो स्वीकारल्याने मुश्रीफ आणि त्यांच्या मुलांविरोधातील मनी लाँड्रिंग प्रकरणाचा कायदेशीर अध्याय संपला आहे. हसन मुश्रीफ, त्यांची मुले आणि सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याशी संबंधित आर्थिक व्यवहारांची ईडीकडून चौकशी सुरू होती. कंपनी नोंदणी कार्यालयाने (RoC) मार्च २०२२ मध्ये दाखल केलेली तक्रार आणि कोल्हापूर जिल्ह्यातील मुरगूड पोलीस ठाण्यात फेब्रुवारी २०२३ मध्ये दाखल झालेला एफआयआर या दोन प्रकरणांच्या आधारे ईडीने तपास सुरू केला होता. डीच्या आरोपानुसार, २०१३-१४ या आर्थिक वर्षात साखर कारखान्याला कोलकात्यातील काही शेल कंपन्यांच्या माध्यमातून ११.३५ कोटी रुपयांहून अधिक निधी मिळाला होता. या व्यवहारांमध्ये आर्थिक गैरव्यवहार आणि पैशांची हेराफेरी झाल्याचा संशय ईडीने व्यक्त केला होता. या आरोपांच्या अनुषंगाने मुश्रीफ आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यात आली.

५०० कोटींच्या ऑडिओ क्लिपचा सोर्स गरीब माणूस:त्याच्या जिवाला धोका होऊ नये; मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी मीडियासमोर जबाबदारी घ्यावी -मनोज जरांगे

जालना : मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या कथित ५०० कोटी रुपयांच्या ऑडिओ क्लिप प्रकरणात मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारला थेट आव्हान दिले आहे. विशेष तपास पथकाने (SIT) ऑडिओ क्लिपची मागणी केल्यानंतर जरांगे यांनी स्पष्ट केले की, "तपास यंत्रणेला क्लिप द्यायला आम्ही कधीही तयार आहोत; आमच्या वकिलांनी ती दिलीही असेल. पण सरकारला जर या क्लिपचा मूळ सोर्स (स्रोत) हवा असेल, तर आधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्या व्यक्तीच्या सुरक्षेची जाहीर जबाबदारी स्वीकारली पाहिजे. तो सोर्स एखादा सामान्य आणि गरीब माणूस असू शकतो, त्याच्या जिवाशी खेळण्याचा अधिकार कोणालाही नाही," अशी आक्रमक भूमिका जरांगे यांनी जालना येथे पत्रकारांशी बोलताना मांडली. यासोबतच, दिवाळीच्या तोंडावर मराठवाड्यात भीषण दुष्काळाचे सावट असताना, ५,००० रुपयांच्या मदतीवरून त्यांनी सरकारवर ताशेरे ओढले आणि शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत टोकाचे पाऊल न उचलण्याचे कळकळीचे आवाहन केले. एसआयटी चौकशी आणि ऑडिओ क्लिपच्या मुद्द्यावर सविस्तर बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, "एसआयटीला तपास कामासाठी क्लिप हवी असेल तर आमच्या वकिलांना आम्ही तसे कळवले आहे. मुळात ही ऑडिओ क्लिप त्यांच्याच एका मंत्र्याकडे आधीपासून उपलब्ध होती. मग ते का देत नाहीत? त्यांचे काय डाव आहेत हे त्यांनाच ठाऊक." "माध्यमांच्या समोर येऊन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या दोघांनी सांगावे की, 'आम्ही क्लिप देणाऱ्याच्या जीविताची पूर्ण जबाबदारी घेतो, त्याला काहीही होऊ देणार नाही.' गरीब माणसांनी जीवावर उदार होऊन ही माहिती बाहेर आणली आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ नोव्हेंबर २०२६

पात्र कर्मचाऱ्यांना १२,५०० रुपये सण उचल; महागाई भत्ता ६० टक्क्यांवर

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ८३ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी प्रत्येकी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान, पात्र कर्मचाऱ्यांना १२,५०० रुपये सण उचल आणि महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज जाहीर केला.एसटी महामंडळातील विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. महामंडळ आर्थिक अडचणींचा सामना करत असतानाही कर्मचाऱ्यांच्या दिवाळीचा आनंद हिरावून घेता येणार नाही, अशी ठाम भूमिका मंत्री सरनाईक यांनी यावेळी मांडली.“एसटीचे अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र मेहनत करून लाखो प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची सेवा देतात. त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून दिवाळीच्या सणानिमित्त त्यांना सानुग्रह अनुदान देणे हे केवळ औदार्य नसून त्यांचा हक्क आहे. या निर्णयामुळे महामंडळावर सुमारे १६० कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार असला, तरी कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, हे आमचे कर्तव्य आहे,” असे प्रताप सरनाईक यांनी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या खंबीर पाठबळामुळे एसटी महामंडळाचे भविष्य उज्ज्वल असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन अथवा संपाचे हत्यार उपसू नये, असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केले. “एसटी ही सर्वसामान्य प्रवाशांची जीवनवाहिनी आहे. कोणत्याही आंदोलनामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये. कर्मचारी आणि प्रवासी हे एसटीचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर संवादातून मार्ग काढण्यास आम्ही सदैव तयार आहोत,” असेही त्यांनी सांगितले

डोंगरावरील पालांमध्ये दिवाळीचा आनंद; पारधी समाजातील महिलांना साड्यांची भेट



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : जिंतूर तालुक्यातील वडधुती परिसरात एचएआरसीचा उपक्रम; नऊ कुटुंबांतील महिलांना प्रत्येकी तीन साड्यांचे वाटपजिंतूर : दिवाळीचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या सामाजिक बांधिलकीतून होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एचएआरसी), परभणी यांच्या वतीने जिंतूर तालुक्यातील वडधुती परिसरातील डोंगरावर पालांमध्ये वास्तव्यास असलेल्या पारधी समाजातील महिलांना दिवाळीनिमित्त साड्यांचे वाटप करण्यात आले.या उपक्रमांतर्गत नऊ कुटुंबांतील महिलांना प्रत्येकी तीन साड्या भेट देण्यात आल्या. डोंगराळ भागात पालांमध्ये वास्तव्यास असलेल्या या महिलांच्या आयुष्यात सणाच्या निमित्ताने आनंदाचे क्षण निर्माण व्हावेत आणि त्यांनाही दिवाळीच्या आनंदात सहभागी होता यावे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.या साडी वाटपासाठी एचएआरसी संस्थेच्या टीम सदस्या सौ. नेहा मुरक्या तसेच माता-भगिनींनी वस्तुरूप स्वरूपात साड्यांचे योगदान दिले. त्यांच्या या दातृत्वामुळे पारधी समाजातील महिलांना दिवाळीनिमित्त साडी भेट देणे शक्य झाले.यावेळी एचएआरसीचे समन्वयक प्रकाश डुबे, संतोष बारबिंडे, शंकर माने आणि रामचंद्र भगत उपस्थित होते. त्यांनी महिलांशी संवाद साधत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.समाजातील गरजू आणि वंचित घटकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून मदतीचा हात देण्याचा एचएआरसीचा हा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देणारा ठरला. या उपक्रमासाठी वस्तुरूप योगदान देणाऱ्या सौ. नेहा मुरक्या आणि सर्व माता-भगिनींचे संस्थेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची मुरूम येथील सागर कुटुंबीयांना सांत्वनपर भेट



मुरूम (प्रा. सुधीर पंच्चगल्ले) : राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी गुरुवारी (ता. ५) रोजी मुरूम, ता. उमरगा येथील भीमनगर भागातील त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन आपले विशेष कार्य अधिकारी राजकुमार सागर यांच्या कुटुंबीयांचे कौटुंबिक सांत्वन केले. राजकुमार सागर यांचे वडील तथा माजी मुख्याध्यापक कै. मंगेश सागर यांचे नुकतेच निधन झाले आहे.निधनाची दुःखद बातमी कळताच राज्यपाल बागडे यांनी गुरुवारी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथून रस्तेमार्गाने प्रवास करत दुपारी १२ च्या सुमारास मुरूम येथील सागर यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी त्यांनी कै. मंगेश सागर यांच्या प्रति आदर आणि श्रद्धांजली व्यक्त करून सागर परिवाराची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. याप्रसंगी आमदार बसवराज पाटील, राजकुमार सागर, पोलीस उपाधीक्षक विजय सागर, सेवानिवृत्त जिल्हा कृषी अधीक्षक गायकवाड उपस्थित होते. या भेटीदरम्यान काही वेळ सागर कुटुंबीयांशी चर्चा केल्यानंतर दुपारी १ वाजता राज्यपाल हरिभाऊ बागडे हे रस्तेमार्गाने छत्रपती संभाजीनगरकडे परत रवाना झाले.

आयोगाने मांडलेल्या आकडेवारीवर याचिका कर्त्यांचा आक्षेप

मुंबई (प्रतिनिधी) : मराठा आरक्षणा बाबत 5 नोव्हेंबर रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जेष्ठ वकील प्रदीप संचेती यानी नमूद आकडेवारी स्वयं घोषीत असल्याचा व आयोगाने मांडलेल्या आकडेवारीवर याचिका कर्त्यांचा आक्षेप नोंदवत ज्याना आरक्षण द्यायचे आहे त्याना विचारुन तयार केल्याचा आक्षेप घेत राम सिंह निकालातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचा आधार घेत आक्षेप घेतला.117 पैकी 90 गुण हे राज्य सरासरीच्या निकषाचे पालन न करता दिलेले आहेत असा आक्षेप वकील संचेती यानी घेतला आहे.5 नोव्हेंबर रोजी झालेल्या सुनावणीवेळी न्यायालयाने सलग अथवा आठवड्यातील तीन दिवस सुनावणी घेण्यास नकार दिला आहे.या मागणीला महाधिवक्ता यानी आक्षेप घेतला होता.आयोगाने मांडलेल्या आकडेवारीला आक्षेप घेताना वकील प्रदीप संचेती यानी मराठा समाज इतका मागासलेला असेल तर आरक्षणातील अन्य समुहांची तपासणी करून प्रगत समुहाना वगळावे लागेल असा महत्वाचा युक्तिवाद न्यायलयाच्या समोर मांडला आहे जो सरकारने मराठा आरक्षण कायद्यातील कलम 4 (4) नुसार दिलेल्या बेकायदा संरक्षणावर बोट ठेवणारा आहे.हे केलेल सर्वेक्षण हे मराठा समाजाला मागास ठरवण्या फ्रॉड पद्धतीने करण्यात आल्याचे त्यानी न्यायालयासमोर मांडले.यामुळे ज्या डेटा आधारे मागासपणा सिद्ध होत नाही तिथे अपवादात्मक परिस्तिथी दाखवून आरक्षण देणे हे विविध न्याय निवड्या नुसार चुकीचे आहेअशी भूमिका मांडली.16 टक्के प्रतिनिधित्व 9 टक्के कसे झाले ? हे सिद्ध करण्याची त्यानी मागणी केली आहे.शासकीय सेवेतील प्रतिनिधित्वाची आकडेवारी मांडत आक्षेप घेतला.समरी मधील आकडेवारी 16% असताना 9% आकडेवारी कशी आली असा देखील त्यानी आक्षेप नोंदवला.या झालेल्या सुनावणीला अनवानी असलेले मराठा समाजाच्या वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता व जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील हे एकमेव उपस्थित होते. त्यांचे सोबत मुंबई टीमचे रामचंद्र शेडगे, प्रफुल्ल पवार यांचे सह प्राचार्य तांबे शासनाचे वकील मिलिंद साठे, जेष्ठ वकील विजयसिंह थोरात व इतर वकिला सह मराठा आरक्षण कक्षाचे व मागास आयोगाचे अधिकारी उपस्थित होते.पुढील सुनावणी ही 27 नोव्हेंबर 2026 रोजी होणार आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ नोव्हेंबर २०२६

राज्यातील भरती परीक्षा सुधारणांसाठी गठित उच्चस्तरीय समितीचाअंतरिम अहवाल शासनास सादर

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : राज्यातील भरती परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय दिनांक 4 सप्टेंबर 2026 अन्वये उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीने राज्यातील विविध विभागांमधील विद्यार्थी व संबंधित हितधारकांशी केलेल्या सल्ला मसलतीदरम्यान प्राप्त मागण्या, सूचना व अभिप्रायांचा अभ्यास केला आहे.विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या काही महत्त्वाच्या व तातडीच्या मुद्यांवर प्राधान्याने निर्णय घेणे आवश्यक असल्याने समितीने अंतरिम अहवाल शासनास सादर केला आहे. उच्चस्तरीय समितीच्या प्रमुख शिफारशीपरीक्षेतील पदसंख्येत वाढ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2026या परीक्षेसाठी सुमारे 12 लाख उमेदवारांनी अर्ज केले असून सध्यास्थितीत 5 हजाराहून अधिक पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. विविध विभागांकडून आणखी 11 हजाराहून अधिक पदांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आली आहे. ही अतिरिक्त पदे शुद्धिपत्रकाद्वारे समाविष्ट करून एकूण पदसंख्या 16 हजारापेक्षा अधिक करण्याची शिफारस करण्यात आली आहे. सर्व भरती परीक्षांसाठी: कमाल वयोमर्यादेत एक वेळची एक वर्षाची सवलतउमेदवारांच्या मागण्यांचा विचार करून कमाल वयोमर्यादेत एक वेळची विशेष बाब म्हणून एक वर्षाची सवलत देण्याची शिफारस करण्यात आली आहे. ही सवलत दिनांक 1 जानेवारी 2026 नंतर प्रसिद्ध झालेल्या व निवड प्रक्रिया सुरू न झालेल्या सर्व जाहिराती, तसेच दिनांक 31 डिसेंबर 2027 पर्यंत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी लागू राहील. तसेच, गट-क परीक्षा 2026 परीक्षेसाठी अतिरिक्त पदांकरीता व वयोमर्यादा सवलतीमुळे पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना संधी मिळावी यासाठी अर्ज प्रक्रिया एकदा पुन्हा सुरू करण्याची शिफारस करण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या परीक्षा प्रक्रियेबाबत इतर महत्त्वाच्या शिफारशीगट-क पूर्व परीक्षेच्या विद्यमान परीक्षा पद्धतीत व अभ्यासक्रमात कोणताही बदल न करणे, नव्याने समाविष्ट होणाऱ्या संवर्गांचे मुख्य परीक्षेचे अभ्यासक्रम लवकरच जाहीर करणे, खबरदारीचा उपाय म्हणून यापूर्वीची प्रश्नपत्रिका निर्मितीची कार्यवाही रद्द करून सुरक्षित प्रक्रियेद्वारे नव्याने प्रश्नपत्रिका तयार करणे, प्रश्नपत्रिका व ओएमआर उत्तरपत्रिकांची छपाई, साठवणूक व वाहतूक यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवणे, तसेच परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख, सिग्नल जॅमर आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची व्यवस्था करणे आदी शिफारशी समितीने केल्या आहेत

बीडमध्ये दुष्काळ निवारणासाठी प्रशासनाचे सूक्ष्म नियोजन; जल, चारा आणि रोजगारावर लक्ष केंद्रित करण्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या सूचना

बीड (भगवंत पाळवदे) : जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर, राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळ आढावा बैठक पार पडली. या बैठकीत चारा, पिण्याचे पाणी आणि अपूर्ण योजना यावर प्रामुख्याने चर्चा झाली असून, पंकजा मुंडे यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील टीमच्या कामाचे कौतुक केले आहे.शेतकऱ्यांना मदत आणि पीकविमाजिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केलेल्या सादरीकरणानुसार, यंदा जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ६३ टक्के पाऊस झाला आहे. यामुळे ७ लाख ८४ हजार ४७९ हेक्टरवरील पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले असून, प्रशासनाने ७५४ कोटी ७९ लाख रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना पीक विम्यापोटी पाच हजार रुपये आगाऊ रक्कम देण्याचे नियोजन आहे. तसेच, मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली दिवाळीची मदत आणि कर्जमाफीची सद्यस्थिती (KYC) याबाबतही या बैठकीत आढावा घेण्यात आला.पाणीटंचाई आणि अवैध उपशावर कारवाईजिल्ह्यातील भूजल पातळीत ४.५५ मीटरने घट झाली असून, १६४ प्रकल्पांमध्ये केवळ १२.०१ टक्के पाणीसाठा उरला आहे. ५१ प्रकल्प कोरडे पडल्याने २९४ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने २७१० अवैध पाणी जोडण्या खंडित करून २६६ पंप जप्त केले आहेत. पंकजा मुंडे यांनी भूजल पातळी कमी होण्यावर चिंता व्यक्त करत, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पुढील पावसाळ्यापर्यंतचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या आणि प्रलंबित पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.पशुधन आणि चारा व्यवस्थापनजिल्ह्यात सध्या उपलब्ध असलेला चारा केवळ २६ दिवस पुरेल असा अंदाज आहे. वसुबारस आणि गोवर्धन पूजेचा संदर्भ देत, पंकजा मुंडे यांनी पशुधनाच्या सद्यस्थितीवर विशेष चिंता व्यक्त केली. माणसांप्रमाणेच मुक्या प्राण्यांनाही पाण्याचा आणि चाऱ्याचा त्रास होत असल्याचे त्या म्हणाल्या. वन विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि सीएसआर (CSR) च्या माध्यमातून चारा निर्मितीचे नियोजन करण्यात आले आहे. भविष्यात चारा छावण्यांची गरज भासल्यास त्यात 'जिओ फेन्सिंग' (Geo-fencing) आणि जनावरांच्या टॅगिंगचा वापर करण्याचे ठरले आहे.महिला सक्षमीकरण आणि स्थानिक उत्पादनांना चालनाबीड आणि जालना येथील स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यावरही या बैठकीत चर्चा झाली. महिला बचत गटांच्या माध्यमातून जालना आणि बीडच्या रेशीम व हातमाग उत्पादनांचा स्वतंत्र ब्रँड तयार करून महिलांना रोजगार मिळवून देण्याचे नियोजन असल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितले. दुष्काळी परिस्थितीत मजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत 'गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार', नाला खोलीकरण आणि जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. या सर्व उपाययोजनांची योग्य अंमलबजावणी करून प्रशासनाने सर्वसामान्यांना व शेतकऱ्यांना वेळेवर मदत पोहोचवावी, असे निर्देश मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले आहेत. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते

तसा बराच चुकत गेलो

तसा बराच चुकत गेलो
आयुष्याच्या वाकड्या तिकड्या
पायवाटेनं चालतांना..

तशी खूप दुखवली मने
कळत नकळत.. मी

केलंय माप मोठ्या मनानं
आभाळाएवढं काळीज
असणाऱ्या माणसांनी..

तर काहींनी तसंच ठेवलं
मेंदूच्या आत
वर्षानुवर्षापासून कायम..

आता
खूप लोटलाय काळ
बरंच वाहून गेलं पाणी
पुलाखालून अन् वरून
दिस ही सरलेय सावलीचे..

आता
या उन्हाच्या दिसात
मोकळा होऊ म्हणतो
माफी मागून
कळत नकळत केलेल्या
चुकीबद्दल
त्या दुखावलेल्या आत्म्यांची..

पुढचा प्रवास सुरळीत
होण्यासाठी..

ज्ञानेश्वर गायके,
कन्नड

लेखणीची धार

शब्द शब्दातून वाहे,
तेज लेखणीची धार.
जुल्म अत्याचारावर,
करे शब्दातून वार. १

अज्ञानास पळवितो,
ज्ञान उकलून पार,
शब्द अर्थातून सांगे,
गुढ शब्दांचा तो सार. २

लेखणीच्या तालावर,
भले भले नाचतात.
लेखणीच्या धारेपुढे,
गावगुंड वाकतात. ३

लेखणीची धार सदा,
वाचा फोडते दुःखाला.
झुंड वृत्तीला गाडूनी,
देते आकार सुखाला. ४

लेखणीची धार मनी,
आग क्रांतीची लावते.
अन्यायाला जाळतांना,
स्वतः पुढेच धावते. ५

लेखणीच्या धारेपुढे,
कुठे कुणाचे चालते.
शब्द शब्द पेटतांना,
घाव डोक्यात घालते. ६

लेखणीची धार मित्रा,
नित्य सत्यास जागते.
शब्द शब्द पेटवुनी,
न्याय हक्काने मागते. ७



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

सिंदगाव तालुका तुळजापूर येथे आमदार बसवराज पाटील यांची सदिच्छा भेट



मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) : तुळजापूर तालुक्यातील शिंदगाव येथे आमदार बसवराज पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. आ.पाटील यांनी दुष्काळ निमित्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. तेथील पाणी टंचाई रोजगार चारा टंचाई याबाबत संवाद साधला. ग्रामपंचायत च्या वतीने त्यांचे आमदार पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे अनुसूचित जाती मोर्चा चे जिल्हाध्यक्ष दिलीप भालेराव , मुरुमचे माजी नगराध्यक्ष रशीद शेख,जळकोट येथील समाजसेवक भीमाशंकर हासुरे, शरण पाटील होर्टीकर, सोसायटी चे माजी चेअरमन अण्णाराव कुलकर्णी, प्रकाश बेडजिरगे माजी ग्राम पंचायत सदस्य प्रताप पाटील गुरुनाथ परमशेट्टी गंगाधर पेठ सांगळे विजयकुमार पेठ सांगळे सातप्पा परशेट्टी, खंडू चव्हाण रवी पाटील स्वामी आदी उपस्थित होते , सुत्रसंचलन तानाजी घोडके यांनी केले.तत्पुर्वी सिंदगाव येथील सामाजिक कार्यकर्ते महेश कलशेट्टी यांच्या निवासस्थानी भेट दिली यावेळी आमदार पाटील यांचा कौटुंबिक सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ नोव्हेंबर २०२६

डॉ. मोहन सौंदर्य यांची अभ्यास मंडळावर निवड

छत्रपती संभाजीनगर : मुंबई विदयापीठ अंतर्गत गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी(स्वायत) च्या मराठी अभ्यास मंडळाच्या सदस्यपदी डॉ. मोहन सौंदर्य यांची नुकतीच निवड प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष. डॉ शिवराज गोपाळे यांनी केली आहे.या निमित्ताने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. आज दि. 5/11/2026 रोजी पेठेनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या कार्यालयात त्यांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.डॉ. मोहन सौंदर्य हे राजर्षी शाहू महाविद्यालय वाळूज येथे प्रोफेसर असून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विदयापीठ छ. संभाजीनगर च्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य आहेत. त्याबरोबर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल डॉ. ऋषिकेश कांबळे, डॉ. युवराज धबडगे, डॉ. मिलिंद वाव्हळे, डॉ. बाळासाहेब गायकवाड,डॉ. शिवाजी डोळसे, डॉ. सुधाकर नवसागर , डॉ. मधुकर वाकळे,प्रा. दिनेश मगरे, डॉ. वर्षा सौंदर्य, प्रा. अनिल दंडाळे,प्रा. पंकज शिंदे, डॉ. सुखदेव खंदारे यांनी अभिनंदन करून सत्कार केला.

संतवाणीच्या स्वरांनी रंगणार 'दिवाळी अभंगायन महोत्सव २०२६'

छत्रपती संभाजीनगर : भक्तिरस, संतविचार आणि अभंगसंगीताच्या समृद्ध परंपरेचा सुरेल आविष्कार घडविणाऱ्या 'दिवाळी अभंगायन महोत्सव २०२६' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन शिक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर आणि सह्याद्री स्वर मंच यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता मराठवाडा महसूल प्रबोधिनी सभागृह, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे.या महोत्सवाचे उद्घाटन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती अश्विनी लाटकर यांच्या हस्ते होणार असून, मराठवाडा लिगल अॅण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा अॅड. डॉ. कल्पलता पाटील-भारस्वाडकर या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.या सांगीतिक मैफलीचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रा. शंकर विधाते आणि प्रा. गणेश कोटीये यांचे अभंगगायन. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव यांसह संतपरंपरेतील विविध रचनांच्या माध्यमातून भक्तिभावाचा आणि अध्यात्मिक विचारांचा सुरेल अनुभव रसिकांना घेता येणार आहे. या गायनाला तबल्यावर संदीप गुंजकर, संवादिनीवर दिनेश डोळे, पखवाजावर नंदकिशोर हातागळे आणि तानपुऱ्यावर हरिओम भोसले यांची समर्थ साथ लाभणार आहे. कार्यक्रमाचे निवेदन श्री. दिलीप सिरसाठ करणार आहेत.दिवाळीच्या मंगलमय पर्वात संतसाहित्याचा अमूल्य ठेवा, अभंगांची भावस्पर्शी शब्दरचना आणि शास्त्रीय संगीताच्या सुरेल साथीचा अनुभव एकाच मंचावर घेण्याची ही रसिकांसाठी विशेष पर्वणी ठरणार आहे. आधुनिक जीवनशैलीच्या धावपळीत संतविचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आणि अभंगसंगीताची परंपरा जतन व संवर्धित करणे हा या उपक्रमामागील महत्त्वपूर्ण उद्देश आहे.या भक्तिसंगीताच्या सुरेल मैफलीचा आस्वाद घेण्यासाठी शहरातील संगीतप्रेमी, अभंगरसिक, साहित्यप्रेमी, शिक्षकवृंद आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा दिलासा



बीड (भगवंत पाळवदे) : जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि नापिकीमुळे हतबल होऊन आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक व सामाजिक आधार देण्यासाठी प्रशासनाने विशेष पुढाकार घेतला आहे. यात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पाठपुरावा आणि प्रयत्नांना यश आले असून, पुणे येथील श्री शिव गोरक्ष आश्रम ट्रस्ट (आंबेगाव बु.) यांच्या वतीने जिल्ह्यातील २५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील वारसांना प्रत्येकी २५ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले.बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात परिविक्षाधीन सहाय्यक जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक आणि निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत या धनादेशांचे वाटप करण्यात आले. ट्रस्टचे अध्यक्ष किशोर मंडलिक, राजेंद्र अडगळे आणि राजेंद्र दीक्षित यांच्या सौजन्याने दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मदतीसाठी केज, माजलगाव, आष्टी, पाटोदा, अंबाजोगाई, धारूर, गेवराई, बीड, शिरूर कासार आणि वडवणी या तालुक्यातील २५ कुटुंबांची प्रशासनाकडून निवड करण्यात आली होती.वारसांच्या पुनर्वसनासाठी सविस्तर नियोजन आणि मदतीचे स्वरूप:या कार्यक्रमात प्रशासनाने केवळ धनादेशांचे वाटप करून औपचारिकता पूर्ण केली नाही, तर उपस्थित प्रत्येक महिला व वारसांशी अत्यंत संवेदनशीलपणे थेट संवाद साधला. या कुटुंबांना केवळ तात्पुरती आर्थिक मदत न देता, त्यांना कायमस्वरूपी स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी अधिकाऱ्यांनी सविस्तर चाचपणी केली. * स्वयंरोजगारासाठी मदत: कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी अधिकाऱ्यांनी महिलांना त्यांच्या कौशल्यांबद्दल विचारणा केली. ज्या महिलांना शिवणकाम येते, त्यांना शिलाई मशीन उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच, शेळीपालनाची इच्छा असणाऱ्या महिलांना प्रशिक्षण देऊन शासनामार्फत शेळ्या उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. * शिक्षण व वैद्यकीय सहाय्य: कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्याने मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी मुलांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळवून देण्याबाबत अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. एका कुटुंबातील आजारी व अंथरुणाला खिळलेल्या वृद्ध सदस्यासाठी तातडीने वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. * शासकीय योजनांची खात्री: या सर्व महिलांना संजय गांधी निराधार योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना आणि रेशनचे धान्य नियमित मिळत आहे की नाही, याची अधिकाऱ्यांनी वैयक्तिक पातळीवर खात्री करून घेतली व त्यात येणाऱ्या अडचणी सोडवण्याचे आश्वासन दिले.कर्जबाजारीपणा टाळण्यासाठी सामूहिक विवाहाचे आवाहन:सध्या जिल्ह्यात दुष्काळाचे मोठे सावट असल्याने, या परिस्थितीत लग्नसमारंभांवर अवाढव्य खर्च करून कुटुंबांनी पुन्हा कर्जबाजारी होऊ नये, असा मोलाचा सल्ला प्रशासनाने दिला. ज्या कुटुंबांमध्ये उपवर मुले-मुली आहेत, त्यांनी शासनाच्या सामूहिक विवाह योजनेचा लाभ घ्यावा. या योजनेत सहभागी झाल्यास शासनाकडून २० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते, ज्यामुळे लग्नाचा संपूर्ण खर्च वाचतो. येत्या २४-२५ तारखेला आणि त्यानंतर डिसेंबर महिन्यातही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने सामूहिक विवाह सोहळे आयोजित केले जाणार असून, कुटुंबांनी पैशांची बचत करून समाजकल्याण अधिकाऱ्यांकडे यासाठी नोंदणी करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

जेईएसचे माजी प्राचार्य डॉ. रामलाल अग्रवाल यांचे निधन



जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) : जे ई एस महाविद्यालय जालना येथील माजीप्राचार्य डॉ. रामलालजी अग्रवाल यांचे दिनांक 5 नोव्हेंबर 2026 रोजी दु:खद निधन झाले .डॉ. रामलालजी अग्रवाल हे केवळ एक शिक्षणतज्ज्ञ नव्हते, तर साहित्यिक, समीक्षक, विचारवंत, वाचनसंस्कृतीचे पुरस्कर्ते आणि विद्यार्थ्यांना सतत प्रेरणा देणारे मार्गदर्शक होते. शिक्षणासोबतच साहित्य, कला, संस्कृती आणि सामाजिक प्रबोधनाच्या क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, स्वतंत्र विचारांची क्षमता आणि सर्जनशीलता विकसित व्हावी, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील होते.त्यांच्या निधनाने शैक्षणिक, साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील एक मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या स्मृती आणि कार्य सदैव प्रेरणादायी राहतील. अंत्यविधीचा कार्यक्रम दि.6 नोव्हेंबर 2026, शुक्रवार रोजी सकाळी 10.00 वाजता ,अमरधाम,जालना येथे होणार आहे .डॉ रामदास अग्रवाल यांना जालना एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी व जे ई एस महाविद्यालया जालना, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ नोव्हेंबर २०२६

आदिम जमाती व पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी १६० कोटी रुपयांचे विशेष पॅकेज

मुंबई/बीड (भगवंत पाळवदे) : राज्य शासनाने 'विकसित महाराष्ट्र २०४७' अंतर्गत कातकरी, कोलाम व माडिया या आदिम जमातींसह पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात १६० कोटी रुपयांच्या विशेष पॅकेजची तरतूद केली आहे. यापैकी आदिम जमातींसाठी १३० कोटी रुपये, तर पारधी समाजासाठी ३० कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. वैयक्तिक आणि सामूहिक लाभाच्या योजनांसाठी १०० टक्के शासकीय अनुदान देण्याची तरतूद या पॅकेजमध्ये करण्यात आली आहे. आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेजद्वारे निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली होती. त्यानुसार राज्य शासनाने २ नोव्हेंबर २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून या पॅकेजची अंमलबजावणी सुरू केली आहे. आदिम जमाती पॅकेजमधील १३० कोटी रुपयांपैकी १०० कोटी रुपये मूलभूत सोयी-सुविधांसाठी, तर ३० कोटी रुपये वैयक्तिक आणि सामूहिक लाभाच्या योजनांसाठी वापरण्यात येणार आहेत. पारधी समाजासाठीच्या ३० कोटी रुपयांपैकी १० कोटी रुपये मूलभूत सोयी-सुविधांसाठी आणि २० कोटी रुपये वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या योजनांसाठी उपलब्ध असतील.वैयक्तिक व सामूहिक योजनांना १०० टक्के शासकीय अनुदानया पॅकेजनुसार वैयक्तिक योजनेसाठी कमाल ५० हजार रुपये, तर दोन किंवा अधिक लाभार्थ्यांच्या सामूहिक योजनेसाठी कमाल ७ लाख ५० हजार रुपयांपर्यंत शासकीय अनुदान देण्यात येणार आहे. अन्य विभागांच्या योजनांमध्ये लाभार्थ्यांना स्वहिस्सा भरणे शक्य नसल्यामुळे ते लाभापासून वंचित राहत असल्यास, हा हिस्साही आदिवासी विकास विभाग या पॅकेजमधून उपलब्ध करून देणार आहे. महिला सक्षमीकरणासाठी अधिकाधिक महिला बचत गटांच्या स्थापनेला प्रोत्साहन दिले जाणार आहे. महिलांनी सामूहिक उपक्रम हाती घेऊन कुटुंबाचे आर्थिक सक्षमीकरण करावे, यासाठी गटांना ७ लाख ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. आवश्यक स्वहिस्सा भरण्यासाठीही पॅकेजमधून मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे.या पॅकेजमधील निधीच्या माध्यमातून आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, नरेगा जॉब कार्ड, आयुष्मान कार्ड आणि बँक खाते यांसारखी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी समन्वय, जनजागृती आणि विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. आरोग्य तपासणी शिबिरे, अंगणवाडी सेविका, आशा सेविका आणि परिचारिकांच्या भेटी, आरोग्य शिक्षण तसेच शासकीय आरोग्य योजनांचा लाभ दिला जाणार आहे.महिला सक्षमीकरणासह शिक्षण व आरोग्य सुविधांवर भरआदिम जमाती व पारधी समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी वस्तीशाळा, रात्रशाळा आणि प्रौढ शिक्षणाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आणि स्थलांतरित कुटुंबांतील मुलांसाठी उन्हाळ्यात आश्रमशाळांमध्ये निवासी शिबिरे आयोजित करण्याचाही पॅकेजमध्ये समावेश आहे. पारधी समाजासाठी जनजागृती; आदिवासी संस्कृती व वनहक्कांचे संवर्धनपारधी समाज आणि पोलीस यंत्रणा यांच्यातील गैरसमज दूर करण्यासाठी आदिवासी विभागामार्फत संवाद व समाजप्रबोधनाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच पारधी समाजाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासह परस्पर विश्वास वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. आदिवासी संस्कृती, चालीरीती, कला, परंपरा आणि अस्मिता जपण्यासाठी विविध सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे पेसा व वनहक्क कायद्याबाबत जनजागृती, वनहक्कधारकांना सहाय्य, वनउत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, उपजीविकेसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण आणि प्रशिक्षणानंतर रोजगार व वनउत्पादनाधारित व्यवसायांसाठी मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे

सेवानिवृत्तीनंतरही अभ्यासाची ज्योत तेवत! कमलाकर मोटे यांना छत्रपती संभाजीनगर येथे राज्यपालांच्या हस्ते 'डॉक्टरेट' पदवी प्रदान



मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) : इच्छाशक्ती आणि अभ्यासाची जिद्द असेल तर वयाची किंवा निवृत्तीची कोणतीही अट आड येत नाही, हे मुरूम येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेचे सेवानिवृत्त केंद्रप्रमुख तथा आष्टा (का.) येथील रहिवासी कमलाकर मोटे यांनी सिद्ध केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर च्या ६७ व्या दीक्षांत समारंभात त्यांना महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती मा. जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते बुधवारी (ता. ४) रोजी 'डॉक्टरेट' (पीएच.डी.) पदवीने सन्मानित करण्यात आले.या भव्य दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल जिष्णु देव वर्मा होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल तंत्रज्ञान' (ICT) चे कुलगुरू प्रा. अनिरुद्ध पंडित यांची उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी, प्र-कुलगुरू प्रवीण वक्ते, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. डॉ. बाबासाहेब डोळे, प्रा. डॉ. संजय कवडे आदींच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. कमलाकर मोटे यांना ही पदवी बहाल करण्यात आली.डॉ. कमलाकर मोटे यांनी "लातूर शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास" या महत्त्वपूर्ण विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता. हा संशोधन कार्य त्यांनी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील प्रा. डॉ. भीम माने यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पूर्ण केला.सेवानिवृत्तीनंतर कोणत्याही स्वरूपाचा प्रत्यक्ष आर्थिक किंवा सेवाविषयक लाभ नसताना केवळ ज्ञानाची लालसा आणि संशोधनाची आवड म्हणून त्यांनी ही पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल उमरगा-लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी, नवनिर्वाचित पदवीधर आमदार प्रतापसिंह पाटील, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. डॉ. व्यंकटेश लांब, इतिहास तज्ञ प्रा. डॉ. ओमशिवा लिगाडे (नळेगाव), रोटरीचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, प्रा. गुणवंत जाधवर, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, प्रा.डॉ.ओमप्रकाश चिलगर,प्रा.डॉ.सुधीर पंचगल्ले,प्राचार्य लंकेश्वर थोरात(कळंब),गणेश शिंदे(ज्ञानोपासक कॉलेज,परभणी),केंद्रप्रमुख बबिता महानूर, कंटेकूर शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मीकांत पटणे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सिद्रामप्पा तडकले, अर्जुन धुळेकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, नातेवाईक आणि मित्र परिवाराने त्यांचे मनापासून अभिनंदन केले आहे. डॉ. मोटे यांचे हे यश शिक्षण क्षेत्रात व समाजमनात कौतुकाचा विषय ठरला असून नवोदितांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ नोव्हेंबर २०२६

अधिकारांची जाणीव, कर्तव्यांचा विसर ! : नागरी जाणीवेचा सामाजिक प्रश्न - प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे



नागरी जाणीव (Civic Sense) हा सुसंस्कृत, लोकशाहीवादी आणि प्रगत समाजाचा मूलभूत आधार आहे. मानव हा सामाजिक प्राणी असून तो समाजामध्ये राहतो आणि सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी एकमेकांवर अवलंबून असतो. त्यामुळे समाजाचे सुरळीत कामकाज चालण्यासाठी परस्पर आदर, शिस्त, सहकार्य आणि सामूहिक जबाबदारीची भावना आवश्यक असते. सार्वजनिक जीवनातील नागरिकांची जाणीव, दृष्टिकोन आणि वर्तन यांना नागरी जाणीव असे म्हणतात. यामध्ये सार्वजनिक ठिकाणे, कायदे, सार्वजनिक मालमत्ता आणि इतर नागरिकांप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांचा समावेश होतो. नागरी जाणीव म्हणजे केवळ नियमांचे पालन करणे नव्हे, तर स्वतःच्या सामाजिक जबाबदाऱ्या समजून घेणे आणि इतरांच्या अधिकारांचा आदर करणे होय. **१. नागरी जाणीव आणि सार्वजनिक स्वच्छता** स्वच्छता हा नागरी जाणीवेचा सर्वांत महत्त्वाचा निदर्शक आहे. रस्त्यावर कचरा टाकणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, उद्यानांमध्ये कचरा करणे आणि सार्वजनिक स्वच्छतागृहांचा गैरवापर करणे यामुळे अस्वच्छता निर्माण होते. त्यातून पर्यावरण प्रदूषण आणि विविध आजारांचा प्रसार होतो. सार्वजनिक स्वच्छता ही केवळ नगरपालिका किंवा स्थानिक प्रशासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि स्वच्छता अभियानांमध्ये सहभागी होणे ही प्रत्येक स्वच्छता अभियान यशस्वी होऊ शकत नाही. **२. वाहतूक शिस्त आणि रस्ते सुरक्षा** वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे हा नागरी जबाबदारीचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे. वाहतूक सिग्नल तोडणे, विरुद्ध दिशेने वाहन चालवणे, अनावश्यक हॉर्न वाजवणे, बेकायदेशीर पार्किंग करणे तसेच हेल्मेट आणि सीट बेल्टचा वापर न करणे यामुळे अनेकांचे जीव धोक्यात येतात. वाहतुकीचे नियम सार्वजनिक सुरक्षितता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तयार केलेले असतात. वाहतूक पोलीस उपस्थित नसतानाही नियमांचे पालन करणे हे खऱ्या नागरी जाणीवेचे लक्षण आहे. **३. सार्वजनिक मालमत्तेचा आदर आणि संरक्षण** रस्ते, बस, रेल्वेस्थानके, उद्याने, शाळा, रुग्णालये आणि शासकीय इमारती या सार्वजनिक मालमत्ता आहेत. त्यांची निर्मिती नागरिकांनी भरलेल्या कराच्या पैशातून झालेली असते. सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करणे, भिंतींवर अनावश्यक लिखाण करणे, जाहिराती लावून विद्रूपीकरण करणे आणि आंदोलनांच्या वेळी सार्वजनिक सुविधांचे नुकसान करणे हे बेजबाबदार वर्तन आहे. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, कारण या सुविधा संपूर्ण समाजाच्या मालकीच्या आहेत. **४. आदरयुक्त सामाजिक वर्तन** नागरी जाणीव केवळ सार्वजनिक ठिकाणांपुरती मर्यादित नसून ती सामाजिक वर्तनाशीही संबंधित आहे. ज्येष्ठ नागरिकांचा आदर करणे, दिव्यांग व्यक्तींना मदत करणे, कामगारांशी सन्मानाने वागणे आणि सार्वजनिक ठिकाणी सभ्य भाषा वापरणे ही नागरी जाणीवेची महत्त्वाची लक्षणे आहेत. त्याचबरोबर सामाजिक विविधतेचा आदर करणेही आवश्यक आहे. जात, धर्म, लिंग, भाषा आणि आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभाव करणे हे समानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या तत्त्वांच्या विरोधात आहे. प्रत्येक व्यक्तीच्या अधिकारांचा, स्वातंत्र्याचा आणि प्रतिष्ठेचा आदर करणारा नागरिकच खऱ्या अर्थाने जबाबदार नागरिक असतो. **५. शिस्त आणि इतरांच्या अधिकारांचा आदर** रांगेत उभे राहणे, इतरांच्या वेळेचा आदर करणे, वेळेचे पालन करणे आणि इतरांना अनावश्यक त्रास होणार नाही याची काळजी घेणे ही नागरी जाणीवेची साधी; परंतु महत्त्वाची उदाहरणे आहेत. रांगेत घुसणे किंवा वैयक्तिक प्रभावाचा वापर करून अनुचित फायदा मिळवणे हे सामाजिक जबाबदारीच्या अभावाचे लक्षण आहे. दैनंदिन जीवनातील अशा छोट्या शिस्तप्रिय कृतींमधून समाजात सुव्यवस्था निर्माण होते. **६. नागरी जाणीवेच्या अभावाचे परिणाम** नागरी जाणीवेच्या अभावामुळे पर्यावरण प्रदूषण, वाहतूक कोंडी, रस्ते अपघात, सार्वजनिक पायाभूत सुविधांचे नुकसान, सामाजिक संघर्ष आणि सार्वजनिक संस्थांवरील विश्वास कमी होण्यासारख्या समस्या निर्माण होतात. त्याचा देशाच्या प्रतिमेवर आणि विकासावरही नकारात्मक परिणाम होतो. केवळ कायदे करून या समस्या सुटू शकत नाहीत. त्यासाठी नागरिकांचे स्वयंस्फूर्त सहकार्य आणि जबाबदार वर्तन आवश्यक आहे. **७. शिक्षण, कुटुंब आणि प्रसारमाध्यमांची भूमिका** नागरी मूल्यांची जडणघडण करण्यात शिक्षणाची महत्त्वपूर्ण भूमिका असते. शाळा आणि महाविद्यालयांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सामाजिक सेवा, शिस्त आणि संविधानिक मूल्ये यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. कुटुंब ही नागरी जाणीवेची पहिली पाठशाळा आहे. मुले आपल्या पालकांचे आणि ज्येष्ठांचे वर्तन पाहून अनेक गोष्टी शिकतात. त्याचप्रमाणे प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमे नागरी जागृती व सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. चुकीची माहिती न पसरवणे, द्वेषपूर्ण संदेश टाळणे आणि इतरांच्या मतांचा आदर करणे ही आधुनिक काळातील डिजिटल नागरी जाणीवेची महत्त्वाची अंग आहेत. **८. नागरी जाणीव आणि लोकशाहीतील जबाबदारी** लोकशाहीच्या प्रभावी कार्यप्रणालीसाठी नागरी जाणीव अत्यंत आवश्यक आहे. जबाबदारीने मतदान करणे, लोकशाही संस्थांचा आदर करणे, शांततापूर्ण मार्गाने आपले मत व्यक्त करणे, मतभिन्नता स्वीकारणे आणि संविधानिक मूल्यांशी बांधिलकी ठेवणे या गोष्टी लोकशाहीला बळकटी देतात. लोकशाहीमध्ये केवळ अधिकार आणि स्वातंत्र्य महत्त्वाचे नसून नागरिकांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्याही तितक्याच महत्त्वाच्या असतात. थोडक्यात, नागरी जाणीव हा जबाबदार, शिस्तप्रिय आणि प्रगत समाजाचा पाया आहे. ती नागरिकांची सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये आणि सामाजिक परिपक्वता प्रतिबिंबित करते. स्वच्छता, वाहतूक शिस्त, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, समानता आणि जबाबदार सामाजिक वर्तन या सामूहिक विकासासाठी आवश्यक बाबी आहेत. नागरी जाणीव विकसित करण्यासाठी शिक्षण, कौटुंबिक संस्कार, जनजागृती, सामुदायिक सहभाग आणि कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी यांची आवश्यकता आहे. शेवटी, सामाजिक परिवर्तनाची सुरुवात प्रत्येक व्यक्तीच्या जबाबदार वर्तनातून होते. समाज केवळ पायाभूत सुविधा आणि आर्थिक प्रगतीमुळे सुसंस्कृत बनत नाही, तर त्या समाजातील नागरिकांच्या जबाबदार वर्तनामुळे खऱ्या अर्थाने प्रगत होतो. नागरी जाणीव म्हणजे केवळ चांगला नागरिक असणे नव्हे, तर एक जबाबदार माणूस असणे होय.

प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002